दिनांक:- ०१ / ११ / २०१९

## क्रिडास्पर्धा समिती २०१९-२०

सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ ट्रस्ट फंडच्या क्रिडास्पर्धा समितीच्या विद्यमाने संघाच्या युवा विकास समिती आणि महिला स्पर्धा समितीच्या सहयोगाने वार्षिक क्रिडास्पर्धा यावर्षी दिनांक २०, २१ व २२ डिसेंबरला आयोजित करण्यात येणार असून त्यासंबंधीचे काही नियम खालीलप्रमाणे आहेत.

१. वार्षिक क्रिडास्पर्धा दि. **२०, २१, २२ डिसेंबर २०१९** रोजी घेण्याचे ठरविण्यात आले आहे. **२५ / १२ / २०१९** हा राखीव दिवस राहील.

२. कॅरम व बुध्दीबळ स्पर्धेतील अंतिम सामने रविवार दिनांक **१५ / १२ / २०१९** रोजी संघाच्या डॉ. मधुकर बळवंत राऊत स्मारक समाजमंदीर, पालघर (प.) येथे सकाळी ठिक १०.०० वाजता भरविण्यांत येतील.

**३. प्रत्येक खेळाडूने स्पर्धेदिवशी रोज सकाळी ८.३० वा. ध्वजारोहण व संध्याकाळी ध्वजावतरण कार्यक्रमास उपस्थित राहणे बंधनकारक आहे.**

४. संघाच्या प्रत्येक शाखेत संबंधित शाखाध्यक्ष व शाखाचिटणीसांनी आपल्या शाखेतील खेळाडूंच्या गटवार वैयक्तिक स्पर्धा रविवार दिनांक **१७ / ११ / २०१९** किंवा **२४ / ११ / २०१९** रोजी घ्यावयाच्या असून प्रत्येक खेळाच्या प्रत्येक गटातील अंतिम फेरीतील प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना मुख्य स्पर्धेमध्ये प्रवेश देण्यात येईल. ह्या विजेत्यांची नावे २७ नोव्हेंबरपर्यंत क्रिडास्पर्धा समितीकडे कळवावीत.

५. संपुर्ण स्पर्धेचे नियंत्रण संघाच्या क्रिडास्पर्धा समितीच्या नेतृत्वाखाली युवा विकास समिती तसेच महिला स्पर्धा समितीच्या सहयोगातून करण्यात येईल.

६. या स्पर्धेसाठी तांत्रिक समिती नेमण्यात येईल व स्पर्धेदरम्यानची कोणत्याही स्वरुपाची तक्रार असल्यास सदर समितीकडे लेखी दिल्यास त्या तक्रारीचे निवारण करण्याचे काम ही समिती करेल.

७. स्पर्धेदरम्यान मद्यपान, मादक / उत्तेजक पदार्थसेवन, धुम्रपान व कोणतेही गैरवर्तन, असभ्य / अर्वाच्य भाषेचा वापर अथवा चिथावणीखोर वक्तव्य करणाऱ्या खेळाडुस तत्क्षणी स्पर्धेबाहेर व क्रिडांगण परिसराबाहेर काढण्यात येईल.

**शाखेत मुले व मुलींसाठी घ्यावयाच्या वैयक्तिक स्पर्धा :-**

१. वय ४ वर्षे पुर्ण ते ६ वर्षे आतील स्पर्धक :- धावणे (३० मी.),

२. वय ६ वर्षे पुर्ण ते १० वर्षे आतील स्पर्धक :- धावणे (६० मी.), चमचा-ग़ोटी (२५ मी.), लांबउडी

३. वय १० वर्षे पुर्ण ते १४ वर्षे आतील स्पर्धक :- धावणे (१०० मी.), लांबउडी,

४. वय १४ वर्षे पुर्ण ते १६ वर्षे आतील स्पर्धक :- कॅरम, बुध्दिबळ, धावणे (१०० मी.) लांबउडी, गोळाफेक

५. वय १६ वर्षे पुर्ण ते ४५ वर्षे आतील स्पर्धक (खुलागट ) :- कॅरम, बुध्दिबळ, धावणे (१०० मी.), लांबउडी, गोळाफेक, थाळीफेक

**६. वय ४५ वर्षांवरील (प्रौढ गट) :- बुध्दिबळ, कॅरम, धावणे (१०० मी.) स्पर्धा**

७. वैयक्तिक स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकावरील स्पर्धकांना चषक तर मुख्य स्पर्धेतील प्रत्येक सहभागी खेळाडुला मेडल देण्यात येईल.

८. प्रत्येक खेळाडूने आधारकार्ड किंवा आयकार्डची प्रत सोबत / मोबाईलवर आणावी.

९. मुख्य स्पर्धेतील गोळाफेकीतील वय १४ वर्षे पुर्ण ते १६ वर्षे आतील सर्व स्पर्धकांसाठी व वय १६ वर्षे पुर्ण ते पुढील वयाचे स्पर्धक (महिला / मुली खुलागट ) साठी ४ किलो तर वय १६ वर्षे पुर्ण ते पुढील वयाचे स्पर्धक (खुलागट पुरुष / मुले )

साठी ६ किलो वजनाचा / आकाराचा गोळा वापरण्यात येईल. शाखेतील प्राथमिक फेऱ्यांसाठी शाखेत उपलब्ध असलेल्या वजनाचा / आकाराचा गोळा वापरण्याची मुभा आहे.

**सांघिक स्पर्धा :-**

१. सर्व सांघिक स्पर्धांसाठी त्रयस्थ पंचांची नेमणुक करण्यात येईल व पंचांचा निर्णय अंतिम असेल.

२. क्रिकेट, व्हॉलिबॉल व कबड्डी या सांघिक स्पर्धांसाठी खेळाडुंची नावे २० नोव्हेंबरपर्यंत कळवावीत. त्यानंतर या नोंदणी झालेल्या खेळाडुंचे मिश्र स्वरुपातील संघ ड्रॉ प्रमाणे तयार केले जातील. त्या सर्व स्पर्धकांना त्यांच्या संघांतील इतर सहकाऱ्यांची नावे स्पर्धेआधी (३० नोव्हेंबरपर्यंत) कळविली जातील.

३. स्पर्धेदिवशी व नोंदणीवेळी प्रत्येक खेळाडूने आधारकार्डाची वा आयकार्डाची प्रत सोबत/ मोबाईलवर आणावी.

४. **२० नोव्हेंबरनंतर नोंदणीसाठी आलेल्या कोणत्याही खेळाडुंचा विचार स्पर्धेसाठी केला जाणार नाही.**

५. क्रिकेट, व्हॉलिबॉल व कबड्डीमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडुंनी नोंदणीवेळी म्हणजेच २० नोव्हेंबरपुर्वी आधारकार्ड वा आयकार्ड दाखवुन त्याकार्डाचे क्रमांक दिल्याशिवाय खेळाडुस स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

६. वय वर्षे १६ पुर्ण केलेल्या खेळाडुंनाच क्रिकेटमध्ये सहभागी होता येईल.

७. सांघिक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व खेळाडुंना (क्रिकेटसाठी) १००/-, (कबड्डीसाठी) ५०/-, (व्हॉलिबॉलसाठी) ५०/- प्रवेश फी नोंदणीवेळी म्हणजेच २० नोव्हेंबरला वा तत्पूर्वीच भरावी लागेल. नोंदणीवेळी प्रवेश फी व आधारकार्ड / आयकार्ड क्रमांक दाखविल्याशिवाय खेळाडुस स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

८. क्रिकेट संघमालक बनण्यासाठी इच्छुकांकडुन क्रिडास्पर्धेसाठी रोख रु. ६०००/- (पुरुष संघ) व रु. २५००/- (महिला संघ) ची देणगी आवश्यक. **पुरुष क्रिकेट संघातील खेळाडुंना त्यांच्या संघमालकांनी टी-शर्ट देणे बंधनकारक राहील. या टी-शर्टच्या पुढील डाव्या बाजुस संस्थेचा रंगीत लोगो (३ इंच X ३ इंच) छापणेही बंधनकारक राहील.**

९. पुरुष व्हॉलिबॉल संघमालक बनण्यासाठी क्रिडास्पर्धेसाठी रू. ३०००/- ची देणगी आवश्यक आहे.

१०. पुरुष कबड्डी संघमालक बनण्यासाठी क्रिडास्पर्धेसाठी रू. ३५००/- व महिला कबड्डी संघमालक बनण्यासाठी रू. २५००/- ची देणगी आवश्यक आहे.

११. संघमालकास लॉटसव्दारे संघ देण्यांत येतील. सरावासाठी साधारण पंधरा दिवसांचा अवधी दिला जाईल.

१२. तांत्रिक समितीकडे एखादी तक्रार आल्यास त्यातील संघाशी वा खेळाडूशी संबंधित व्यक्ती त्या तक्रारीपुरता तांत्रिक समिती सदस्य राहणार नाही.

१३. स्पर्धेसाठी त्रयस्थ पंच नेमण्यात येतील. कृपया कोणीही त्यांच्याशी ओळख दाखविण्याचा वा जवळीक साधण्याचा प्रयत्न करू नये. तसे करणाऱ्यांस प्रतिबंधाच्या कारवाईस सामोरे जावे लागेल.

१४. **सांघिक स्पर्धांसाठी रीतसर नोंदणी करुनही स्पर्धेस गैरहजर राहणाऱ्या खेळाडुस पुढील एका वर्षासाठी सहभाग घेण्यास बंदी करण्यात येईल याची गंभीरपणे नोंद घ्यावी.**

१५. पारितोषिके:-

१. **क्रिकेट:-** पुरुष संघ

विजेता संघ- संघमालकास रोख **रु. ९०००/-** आणि चषक<br>
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. ५००/-**

उपविजेता संघ- संघमालकास रोख **रु. ६०००/-** आणि चषक<br>
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. ३००/-**

स्पर्धावीर क्रिकेटपटु - रोख **रू. ३००/-** (उपांत्य व अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड)

उत्कृष्ठ फलंदाज व गोलंदाज - रोख **रू. २००/-** (उपांत्य व अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड)

२. **क्रिकेट:-** महिला संघ

विजेता संघ- संघमालकास रोख **रु. ४०००/-** आणि चषक
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. ५००/-**

उपविजेता संघ- संघमालकास रोख **रु. २५००/-** आणि चषक
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. ३००/-**

स्पर्धावीर क्रिकेटपटु - रोख **रू. ३००/-** (उपांत्य व अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड)

उत्कृष्ठ फलंदाज व गोलंदाज - रोख **रू. २००/-** (उपांत्य व अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड)

**३. व्हॉलिबॉल :-** पुरुष संघ

विजेता संघ- संघमालकास रोख **रु. ४५००/-**, व्हॉलिबॉल आणि चषक
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. ३००/-**

उपविजेता संघ- संघमालकास रोख **रु. ३०००/-**, नेट आणि चषक
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. २००/-**

स्पर्धावीर - २००/- (अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड)

४. **कबड्डी :-** पुरुष संघ

विजेता संघ- संघमालकास रोख **रु. ५०००/-** आणि चषक
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. ३००/-**

उपविजेता संघ- संघमालकास रोख **रु. ३५००/-** आणि चषक
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. २००/-**

स्पर्धावीर (पकड) रोख **रू. ३००/-** (अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड)

स्पर्धावीर (चढाई) रोख **रू. ३००/-** ((अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड)

५. **कबड्डी :-** महिला संघ

विजेता संघ- संघमालकास रोख **रु. ४०००/-** आणि चषक
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. ३००/-**

उपविजेता संघ- संघमालकास रोख **रु. २५००/-** आणि चषक
प्रत्येक खेळाडूस रोख **रू. २००/-**

स्पर्धावीर (पकड) रोख **रू. ३००/-** (अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड)

स्पर्धावीर (चढाई) रोख **रू. ३००/-** ((अंतिम सामन्यांतील खेळाडूंमधुन निवड

आपले विनित

हार्दिक सुधाकर राऊत
निमंत्रक

संजय सदानंद राऊत
कार्याध्यक्ष